# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्सः ९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनीः ०२२-२६५९०५११/०४०५/१८७९/०११३
Email : info@sra.gov.in


जा.क्र.झोपुप्रा/मुकाअ/कार्यासन-१/टे-६/सन २००९
दिनांक : 10 /०९/२००९

## -: परिपत्रक :-

परिपत्रक क्रमांक १०२

**विषय : झोपडपटटी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना सदनिका/गाळयांचे वाटपनंतर ओळखपत्र वितरणबाबत.**

झोपडपटटी पुनर्वसन योजनेत पात्र झोपडीधारकांना सदनिका/गाळा वितरणानंतर प्राधिकरणाकडून संगणकीय ओळखपत्र वितरण करण्याची तरतूद आहे. झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण मार्गदर्शिकेत अ.क्र.४ झोपडपटटी पुनर्वसन योजना सादर करणे,प्रक्रिया व मान्यता यामधील मुद्या क्रमांक १५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक गाळेवाटप झालेल्या कुटुंबास पती/पत्नी यांच्या जोडनावे संगणकीय ओळखपत्रे झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाकडून देण्यात येतील असे स्पष्ट करण्यात आले आहे, तसेच सदर ओळखपत्रात पुनर्वसन गाळे विक्री/भाडेकराराने देणे/नावे करणे अथवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारे १० वर्षापर्यंत हस्तांतरीत होवू शकणार नाहीत (कायदेशिर वारसदार वगळता) याचा स्पष्ट उल्लेख असेल आणि बेकायदेशिरपणे हस्तांतरीत झालेले गाळे झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण स्वतःच्या ताब्यात घेईल, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांच्या आपसातील विनियत वाटपातील बदल फक्त झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीचे करता येईल अशी तरतूद असल्याबध्दलचा उल्लेख असेल.

वरील तरतूदीस अनुसरुन या सुधारीत परिपत्रकान्वये प्राधिकरणाकडून परिशिष्ट-२ (Annexure-II) मधील पात्र झोपडीधारकांना सदनिका/गाळयांचे वितरण झालेनंतर सहकार कक्षाकडून खालील निर्देशांप्रमाणे ओळखपत्रांचे कामकाज करण्यात येईल.

१) ज्या पात्र झोपडीधारकाला सदनिकांचे/गाळयांचे वितरण करण्यात येत आहे अशा पात्र झोपडीधारकांना सोडतीने सदनिकांचे वितरण वेळी उपस्थित पात्र झोपडीधारक पती/पत्नी यांचे फोटो काढून ओळखपत्र तयार करण्याचे कामकाज करण्यात यावे.

२) ज्या पात्र झोपडीधारकांना यापूर्वी सदनिका/गाळयांचे वितरण करण्यात आले आहे अशा पात्र झोपडीधारक पती/पत्नी यांचे फोटो काढून ओळखपत्र तयार करण्याकरीता संबधित सहकारी गृहनिर्माण संस्थांना सूचित करुन ओळखपत्र तयार करुन वितरण करावे.

३) ओळखपत्र तयार करण्याचे काम प्राधिकरणाचे मान्यतेने मे.श्रध्दा सबुरी कन्सलटंसी. एम.आय.जी.क्लब जवळ,गांधीनगर,बांद्रा-पूर्व,मुंबई-५१ यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

४) ओळखपत्र तयार करणे, त्यावर प्राधिकणाकडील ओळख चिन्ह/होलोग्राम चिकटविणे. लॅमिनेशन करणे, समक्ष संस्थेस भेट देवून ओळखपत्राचे पात्र झोपडीधारकांना वितरण करणे इत्यादि कामकाज सहकार कक्षातील सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,झो.पु.प्रा. यांच्या मार्गदर्शनाखाली राहील.

५) ओळखपत्रावर स्वाक्षरी करण्याचे काम प्राधिकरणाचे वतीने सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,झो.पु.प्रा. हे करतील.

६) प्राधिकरणाकडून सध्या पात्र झोपडीधारकांना सदनिकांचे वितरण वेळी होणारे व्हीडीओ शुटींग. प्राधिकरणाचे प्रतिनिधीचे उपस्थितीत सर्वसाधारण सभेचे व्हिडीओ चित्रीकरण, पात्र झोपडीधारकांचे फोटो काढून ओळखपत्र तयार करण्याचे काम मे.श्रध्दा सबुरी कन्सलटंसी. एम.आय.जी.क्लब जवळ,गांधीनगर,बांद्रा-पूर्व,मुंबई-५१ त्यांचेकडे सोपविण्यात आले असल्याने त्यांचेकडून प्राप्त होणाऱ्या व्हिडीओ चित्रीकरणाचे सी.डी. व ओळखपत्राचे कामकाज इत्यादिवर प्राधिकरणाचे वतीने सहकार कक्षाचे नियंत्रण राहील.

७) पात्र झोपडीधारकांचे फोटो काढून ओळखपत्र तयार करण्याचे काम सध्या मे.श्रध्दा सबुरी कन्सलटंसी,बांद्रा-पूर्व,मुंबई-५१ यांचेकडून करण्यात येत असल्याने त्यांना संस्था/विकासक यांचेकडून प्रति ओळखपत्रामागे मिळणारे रुपये ५०/- यामधून प्राधिकरणाचा प्रशासकीय खर्च म्हणून रुपये १५/- मे.श्रध्दा सबुरी कन्सलटंसी यांनी प्राधिकरणाकडे धनादेशाने जमा करावेत.

८) ज्या पात्र झोपडीधारकांना सदनिकांचे/गाळयांचे वितरण करण्यात आले आहे अशा सर्व पात्र झोपडीधारक पती/पत्नी यांचा एकत्रित फोटो काढून त्यांना ओळखपत्र निर्गमित करावयाचे आहेत.

वरील प्रमाणे परिपत्रकीय सूचनांची अंमलबजावणी सहकार कक्षाकडून करण्यात यावी व सदर बाबतची नोंद प्राधिकरणातील सर्व संबधित विभागानी घ्यावी अशा सूचना देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई.